**प्रेसनोट दि.१३/०९/२०१८**

**"महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम १४२ अन्वये कारवाई केले बाबत.."**

**धनजंय ताजणे,पो.ना.२८८, वारजे माळवाडी पो स्टे पुणे शहर यांची कामगिरी**

**वारजे पो स्टे पुणे शहर**

---

दि.१३/०९/२०१८ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वारजे माळवाडी पो स्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.उप.निरी.गोरे, पो.कॉ.७८८६ कांबळे असे वारजे माळवाडी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करीत असताना,न्यु अहिरेगांव कमानीजवळ एन.डी.रोड,पुणे येथे वारजे पोलीस ठाणेकडील रेकॉर्डवरील तडीपार इसम नामे लखन मोहन घोडके,वय-१९ वर्षे,रा.दांगटवस्ती,रॉयल जीम शेजारी,शिवणे पुणे हा १६/३० वा. तेथे रोड लगत उभा असलेला दिसला. त्यास पुणे शहरातुन दोन वर्षाकरीता तडीपार केले असून तडीपार मुदतीत पुणे शहरात हजर राहणेसाठी सक्षम अधिकारी यांची पुर्वपरवानगी घेतली आहे अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्याने तशी कोणतीही पुर्व परवानगी घेतली नसल्याचे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून पुढील कार्यवाही करीता वारजे माळवाडी पोलीस ठाणे येथे आणले.

तरी दि.१३/०९/२०१८ रोजी १६/३० वा.न्यु अहिरेगांव कमानीजवळ,एन.डी.रोड,पुणे येथे तडीपार इसम लखन मोहन घोडके,वय १९ वर्षे यास मा.पोलीस उप-आयुक्त,परि-१, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्र.११/२०१८ अन्वये,दि.१८/०५/२०१८ रोजी पासुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५५ प्रमाणे पुणे जिल्ह्यातून दोन वर्षा करीता तडीपार केले असतानादेखील त्याने सक्षम अधिकारी यांची कोणतीही पुर्व परवानगी न घेता पुणे जिल्हयात प्रवेश करून वरील आदेशाचा भंग करून,न्यु अहिरेगांव कमानी जवळ एन.डी.रोड,पुणे येथे हजर असताना मिळुन आला आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**